
# क्षणोक्षणी शिक्षण




अभिव्यक्ति मीडिया फॉर डेव्हलपमेंट, नाशिक

# क्षणोक्षणी शिक्षण

फक्त खासगी वितरणासाठी

जानेवारी २००५

**प्रकाशक**

नितीन परांजपे

**संपादन**

सुजाता बाबर

**मांडणी**

मधुलिका महाजन

वैशाली भंगाळे

**मुखपृष्ठ छायाचित्र : साभार Better Photography Vol. 2 No. 9 February 1999**

**मुद्रण**

आकार ऑफसेट प्रिंटर्स, नाशिक.

देणगी मूल्य रु.५/- स्वागतार्ह !

**अर्थसहाय्य**

Aide et Action, भोपाळ

अभिव्यक्ति मीडिया फॉर डेव्हलपमेंट, नाशिक.

## अभिव्यक्तिबद्दल.......

सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत माध्यमांची भूमिका अधिक बळकट करण्यासाठी 'अभिव्यक्ति' ही सामाजिक संस्था नाशिक येथे १९८७ पासून कार्यरत आहे.

समाजातील विविध स्तरांतील लोकांचा संवाद प्रक्रियेतील सहभाग अधिकाधिक वाढावा, लोकांसाठी, लोकांना सक्षम करण्यासाठी माध्यमांचा अतिशय परिणामकारक साधन म्हणून वापर व्हावा यासाठी 'अभिव्यक्ति' काम करते.

लोक व्यवहारात माध्यमांचा वापर व माध्यम व्यवहारात लोकांचा सहभाग वाढावा या उद्देशाने लोकांच्या गरजांबद्दल संवेदनशील असणाऱ्या माध्यमांना पुढे आणण्यासाठी व अशा माध्यमांचा वापर आणि उपलब्धता वाढविण्यासाठी 'अभिव्यक्ति'ने नेहमीच पुढाकार घेतला आहे.

...४

## क्षणोक्षणी शिक्षण बद्दल......

क्षणोक्षणी शिक्षण हा लोकपंचायत (संगमनेर), लोकभारती (गिरणारे), समिधा (त्र्यंबकेश्वर) आणि युवा मित्र (सिन्नर) या संस्थाबरोबर लोकसमूहांच्या शिकण्याच्या पद्धती समजून घेण्याचा अभिव्यक्तिचा प्रयत्न. गेल्या काही दशकांपासून शाळा हे शिक्षणाचे एकमेव केंद्र आहे हे वारंवार लोकांच्या मनावर ठसविलं जात आहे. अंगणवाड्यांपासून प्रौढ साक्षरतेपर्यंतच्या सर्व मोहिमांमधून शाळा, अक्षरज्ञान, गणिती ज्ञान याला अवास्तव महत्व दिले जात आहे. त्यामुळे अक्षर किंवा गणिताची ओळख झाली म्हणजे शिक्षण झाले हा गैरसमज सर्वत्र दृढ होत गेला आहे. परंतु हजारो वर्षांपासून लोक अनेक पद्धतींनी शिकत आले आहेत, शिकताहेत. अनुभवांमधून शिकणं, कृतींमधून शिकणं, अनुभवांच्या देवाणघेवाणीतून शिकणं अशा अनेक स्वाभाविक पद्धती अस्तित्वात होत्या आणि आहेतच. परंतु शालेयकरणाच्या संस्कृतीमधे या 'शिकण्याचं' महत्व कमी झालयं, नष्ट होत चाललयं. स्वाभाविक व निरंतर अशा या शिकण्याच्या प्रक्रियांमधे निर्माण झालेलं ज्ञान व शहाणपण हे शालेय शिक्षणाच्या राजकारणामुळे स्वतःचा दर्जा हरवून बसलं. परंतु दैनंदिन जीवन जगताना हेच ज्ञान व शहाणपण आवश्यक असतं हे सर्वजण मान्य करतातच. प्रत्येक अनुभव हा आपल्याला काहीतरी शिकवण देऊन जात असतो. काही शिकवणी व्यक्तिगत पातळीवर राहिल्यामुळे त्या वैयक्तिक उपयोगितेसाठीच मर्यादित होऊन जातात. त्या सामूहिक पातळीवर येणं गरजेचं आहे. सामूहिक पातळीवर अनुभवांची देवाणघेवाण होते. त्या शिकवणीचे ज्ञानात रुपांतर होण्याची सक्षम प्रक्रिया घडताना आम्ही क्षणोक्षणी शिक्षण अंतर्गत अनुभवत आहोत.

# शिकणं :

## स्वाभाविक, निरंतर व जाणीवपूर्वक प्रक्रिया

एड-एट्-ॲक्शन या आंतरराष्ट्रीय संस्थेचे वैकल्पिक शिक्षणाचे धोरण ठरविण्याकरिता मांडलेले विचार

नितिन परांजपे

शिक्षणाचा विचार करताना, शिक्षण व शाळा यांच्या समीकरणामुळे अनेक मूलभूत प्रश्न निर्माण झाले आहेत. शिक्षण म्हणजे शाळेत जाणे असा अर्थ रुढ झाला आहे. विकासाच्या कार्यक्रम पत्रिकांची परिभाषा आपण स्वीकारल्या आणि काही वर्षांमधे हे समीकरण तयार झाले. २० जानेवारी १९४९ रोजी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन यांनी जागतिक विकासाचे युग घोषित केले व त्यातूनच त्यांनी जगामधील विविध विकसित (अमेरिकेसारखे) व अविकसित लोकसमूहांमधे सहज दुर्लक्षिली जाणारी दरी निर्माण झाली. यामुळे आगळे वेगळे, वैविध्यपूर्ण अस्तित्त्व व जगण्याचे मार्ग स्वीकारलेल्या समाजातले बहुसंख्य परिघावर गेले. 'मागासलेले', 'वंचित' व 'ज्यांचा विकास करण्याची गरज आहे' अशा चौकटीत ढकलले गेले. जागतिक विकासाच्या कार्यक्रमपत्रिका जरी बदलत राहिल्या तरी अशा बहुसंख्य समाजाला वंचित व अविकसित या दृष्टीने पाहणे मात्र तसेच राहिले.

'शिक्षण' हा विकासाचा एक महत्त्वाचा दर्शक मानला गेला. विकसित व्हायचे असेल तर शिक्षण घेणे आवश्यक आहे. हा एक मंत्रच मिळाला व विकासाच्या कल्पना राबविण्यासाठीची धोरणे शिक्षणाभोवती तयार व्हायला लागली. त्यामुळे अविकसित समुदाय हे त्याचे मुख्य लक्षगट बनले व त्यांच्याकरता शिक्षणाची धोरणे, पॉलिसी तयार व्हायला लागल्या.

इराणमधल्या मजिद रहमान या विचारवंताने म्हटले आहे की विकासाचे सामर्थ्य, ते सर्वांनी (लोकसमूहांनी) आत्मसात करण्यामधे आहे. जनमानसात शिक्षण रूजविण्यासाठी तीन धोरणे महत्त्वाची ठरली.

१. शाळा
२. गुलाम बनविणाऱ्या गरजांची निर्मिती
३. लोकांच्या मूलभूत व स्वतःच्या ज्ञानाचे अवमूल्यन.

गेल्या चार दशकांमधे दोन धोरणांमधे अमूलाग्र बदल झाले परंतु 'शाळा' मात्र तशाच राहिल्या.

वंचितांच्या कठीण, कष्टमय उपजीविकांमधून, जीवनामधून सुटका करणारे रामबाण औषध अशा आवरणात शिक्षण गुंडाळले गेले. हळूहळू सोयी-सुविधा देणाऱ्या, गरजा पुरविणाऱ्या संस्थांची बाजारपेठा, दवाखाने, शासनव्यवस्था, शाळा यांची निर्मिती म्हणजे विकास असा मर्यादित व संकुचित विचार पुढे आला. आणि याचमुळे शिक्षण हे अशा शैक्षणिक संस्थांशी जोडले गेले जिथे सध्याच्या उपभोगवादी समाजाला पूरक मूल्ये, विचार व वर्चस्ववादी व्यवस्था तरुणांमधे, लहानांमधे रूजतील. यासाठी पुरवठा मार्ग स्वीकारला. यामधे मुलांनी दिलेली माहिती आत्मसात करणे व लक्षात ठेवणे एवढेच अपेक्षित होते. दुसऱ्यांनी आधीच ठरविलेलं शिक्षण ग्रहण करणे हा शिकण्याचा अर्थ यात गृहीत होता. विद्यार्थ्यांना काय हवं आहे व त्यांना काय समजणं गरजेच आहे हे शासन, संस्था व विद्यापिठांनी ठरवायला सुरुवात केली. हीच धोरणे झाली व यात अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक, परिक्षा, श्रेणी, शिकणे-शिकविणे यांचे घट्ट, न बदलणारे व नियंत्रित, दबावाचे वातावरण निर्माण झाले. शिक्षण व्यवस्थांचा जो काही 'फायदा' सांगितला जातो त्याचा फक्त १% लोकांना खरा लाभ होताना दिसतो. बाकी सर्वजण नको असलेले, निरुपयोगी राहिले, जे छोटी मोठी जसे पेट्रोल पंपावरचे काम, धुणी धुणे, सरकारी कारकूनी करणे, कचरा गोळा करणे अशा कामांमधे अडकले. ज्यात त्यांच्या अंतर्भूत असलेल्या हुशारीला,

क्षमतांना मान्यता देण्याची, व्यवस्थाच नाही. सप्टेंबर २०००च्या EPW (Economic Political Weekly) मधे एका लेखात दिल्याप्रमाणे शहरी भागात ५८.६% पुरुष व ७२.५% स्त्रिया शालेय शिक्षणानंतरही बेरोजगार आहेत. ग्रामीण भागात हे प्रमाण पुरुषांसाठी ६०.४% व स्त्रियांसाठी ५७% आहे. शालेय व्यवस्थेने उपजीविकांचे पारंपारिक मार्ग व ज्ञान पूर्णपणे नाकारले आहे व यामुळे शिक्षित युवकांपुढे जगण्याचे पर्याय कमी झाले आहेत हे आता सर्वांनी स्वीकारले आहे.

शालेय परंपरेत शिक्षा व बक्षिस याला महत्त्व आहे कारण बक्षिस असेल तर मुले जास्त चांगले perform करतील हा विश्वास (?) यात आहे. ही बक्षिसे सर्टीफिकेट, श्रेणी अशा स्वरुपांची आहेत. आता वेगवेगळ्या स्कॉलरशिप्स, वस्तू (prize) ही बक्षिसांची स्वरुपे आहेत. अल्प कोहन यांचे Punished by Rewards नावाचे पुस्तक आहे. यात त्यांनी शेकडो कामगार व मुलांचा अभ्यास केला. यात बक्षिस हे त्यांच्या वर्तणूक बदलासाठी असले तरी तशी प्रगती आढळली नाही. उलट बक्षिसांमुळे बऱ्याच जणांच्या वर्तणुकीत नकारात्मक बदल जास्त प्रमाणात आढळले. कोहन यांचे म्हणणे आहे की बक्षिसामुळे, 'बक्षिस' महत्त्वाचे ठरते, त्यासाठीची कृती नाही. यामुळे स्पर्धा, अधिकारी परंपरा, स्वार्थ, एकमेकांच्या विरोधात उभे राहणे, अशा वृत्ती निर्माण होतात. यामुळे आयुष्य देखील अशीच स्पर्धा आहे, त्यासाठी जिंकणे महत्त्वाचे आहे व जिंकण्यासाठी दुसऱ्याला हरवणे गरजेचे आहे असे अर्थ जीवनाला प्राप्त होताहेत. यात मुलांच्या अंतर्गत सामर्थ्ये, ताकदी,क्षमता, उर्जा, हुशारी, प्रेरणा, विविधता यांना ही व्यवस्था न्याय देण्यात पराभूत झाली आहे.

शाळेप्रमाणे प्रसार माध्यमे पण विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन या वृत्तींना खतपाणी घालत असतात. यात Child Genius सारखे प्रश्नमंजूषेचे कार्यक्रम असतात. यात सर्व भर विशिष्ट प्रकारची माहिती (ज्याला सामान्य ज्ञान म्हणून संबोधले जाते) ती मुलांना किती आहे याच्या स्पर्धात्मक स्वरुपावर असतो. यातून Genius म्हणजे

...८

कोण याचे गैरसमज निर्माण केले जातात. अलौकिकत्त्व ही अत्यंत दुर्मिळ गोष्ट आहे असा आभासही निर्माण केलेला असतो. यामुळे शाळा देखील ज्ञान व मुलांच्या ज्ञाननिर्मितीचे इतर मार्ग याला पूर्णपणे नाकारून टाकते. या स्पर्धा पाहिल्या तर इतरांना मागे टाकून, हरवून पुढे जाणे, सर्वोच्च पदावर पोहोचणे याला फक्त पाठींबाच नाही तर चांगलेच प्रोत्साहन देत असतात. हे कार्यक्रम पाहताना मुले जे शब्द वापरतात, उदा. कसे हरवले, चिरडून टाकला, ढकल त्याला, कोसळला, पाड त्याला... यात प्रचंड हिंसा आहे. अशा प्रकारच्या ज्ञानाला अवास्तव महत्त्व देवून, स्थानिक, पारंपारिक शहाणपण व ज्ञान, यातून निर्माण होणाऱ्या उपजीविका, व जीवनाचा शोध याचे अवमूल्यन केलेले आहे, नाकारले आहे, विरोध आहे, अनादर आहे, तिरस्कार आहे, तुच्छता आहे. यामुळे नोकरी मिळवणे, रोजगार निवडणे याला मर्यादा तर आल्या आहेतच पण ते पूर्णपणे व्यापारी अर्थव्यवस्थेशी जोडले गेले आहे. सध्या शिक्षण व विकास याचा परस्परसंबंध, व्यक्तिकेंद्री वृत्ती, हाव तसेच आर्थिक फायद्यासाठी आपल्या पर्यावरणाचा, सारासार विवेकाचा ऱ्हास यांचा परिपाक म्हणजे अशा प्रकारच्या ज्ञानातून निर्माण होणारी सत्ता, अधिकार.

या शालेय व्यवस्थांची टीका अगदी गांधी, टागोर, कृष्णमूर्ती व अनेक विचारवंतांनी मांडलीच होती. परंतु त्याचे मूल्य आपण लक्षात घेतले नाही. शाळा ही मुलांना निसर्गापासून दूर नेतेच शिवाय ज्याचा निसर्गाशी व वास्तवतेशी काही संबंध नाही अशा प्रकारचे ज्ञान निर्माण करते हे टागोरांनी सांगितले होतेच. त्यांनी हे देखील म्हटले होते की यातला निर्जिवपणा, यांत्रिक व्यवहार, निष्क्रिय शिक्षण, जबरदस्तीची शिक्षा, या शिक्षणातील व्यवहारांमुळे ही व्यवस्था व्यक्तिच्या मानवी मूल्यांना नष्ट करुन टाकणारी आहे.

टागोरांनी शिक्षणाचे प्रमुख चार हेतू सांगितले आहेत

१. सत्यातून एकता साधणे, ज्यात बौद्धिक, भावनिक, शारीरिक, अध्यात्मिक भावविश्वांचा मिलाप आहे.

२. संपूर्ण अस्तित्वाशी एकोपा साधणे, ज्यात सर्व जिवितांच्या परस्परांवलंबनाचा आदर आहे व स्वीकार आहे.
३. पूर्णत्वाकडे जाणे, ज्यात व्यक्ति व समूहांच्या (Communities) पातळीवर स्व-अवलंबन, स्व-विश्वास आणि स्व-आदर आहे.
४. प्रेम व शहाणपण यांची जपणूक करण्यासाठी आत्म्याला मोकळं सोडून देणे.

शाळेमधे मुलांना शिक्षणातून हे मिळणे शक्य नाही. कारण यात आपल्या सोबत्यांकडून, निसर्गाकडून शिकण्याची संधीच नाही व ती निर्माणसुद्धा केली जात नाही. अभिव्यक्ति, सृजनशीलता व स्वतःच्या क्षमतांचा शोध याला शालेय संस्कृतीत जागा मिळणे खूपच कठीण आहे.

शालेय शिक्षणाची ही निष्फळता लक्षात येऊन गांधींनी नई तालीम हा पर्याय पुढे आणला. नई तालीम ही स्थानिक संस्कृतीमधून, श्रमातून शिक्षण याला महत्त्व देणारी होती. शाळेच्या शिक्षणाच्या साचेबंद पद्धतीला आव्हान देणारा हा पर्याय तर होताच पण तो व्यापारी/आर्थिक बाजारपेठेच्या नियंत्रणाला आव्हान देणारा होता. उपजीविकांसाठी व शिक्षणासाठी स्वतःचे कष्ट, श्रम, विचार, बुद्धी यांचा प्रत्यक्ष उपयोग करणारी ही पद्धती होती.

अत्यंत स्पर्धात्मक व शोषण करणाऱ्या रोजगारांचे पर्याय देणाऱ्या आधुनिक बाजारपेठेच्या विळख्याचे वर्चस्व व त्यात होणारी आपली भरड त्यांना आधीच समजली होती.

आताच्या शिक्षणाचे संदर्भ हे सांस्कृतिक संदर्भापासून खूपच लांब आहेत. यामुळे समुदायाबरोबर वाढताना मुले जे श्रम करतात त्याचा व शोषण करणाऱ्या बालमजुरांच्या प्रश्नाला एकत्र करुन टाकले आहे. यामुळे शाळेबाहेर मुले शिकत

नाहीत व ज्या कामात ती सामावलेली असतात ती बालमजुरी आहे हा गैरसमज निर्माण झाला. मुलांचे शिकण्याचे विविध मार्ग असतात त्यामुळे शिकणं हे शिक्षणाचे फलीत आहे ही खोटी समजूत तयार झाली.

सर्वात जास्त शिक्षण हे सहजता व स्वाभाविकता यातून मिळते. यात स्वयंप्रेरणा असते, जीवनाशी जोडलेल्या संदर्भाचे अर्थ असतात, बुजुर्गांबरोबरचा संवाद असतो, चुकांमधून शिकणं असते, स्व-निर्मितीमधे स्वतःचे हात गुंतवणे असते. विविध वयांच्या व्यक्तिंमधे संवाद होऊन त्या अंतर्गत होणारे शिक्षण हे ज्ञानप्राप्तीकडे नेणारे असते. दुर्दैवाने आजच्या शैक्षणिक संस्था या व्यापाराची मोठी ठिकाणे झाली आहे. शिक्षणाचे केंद्र मानलेल्या शाळा स्वतःच्या मुख्य हेतूपासून प्रचंड दूर झाल्या आहेत. शाळा हुकुमशाही पद्धतीने चालविल्या जातात. त्या चौकटीबद्ध व यांत्रिक आहेत. शाळा या स्पर्धा, नफा व उपभोग यांच्या आर्थिक व राजकीय हेतूला पूरक अशा व्यवस्था निर्माण करणाऱ्या झाल्या आहेत. मुलांकडे त्याची उत्पादनक्षमता व आर्थिक मिळकतीच्या क्षमता या दृष्टीकोनातूनच पाहिले जाते. त्यांच्या मधल्या क्षमता, प्रेरणा यात विविधता असू शकते हे याने पूर्णपणे नाकारले आहे. नोएम चॉम्स्कीच्या म्हणण्याप्रमाणे शिक्षण आणि शाळा या एखाद्या उपचारपद्धती (बरे किंवा विकसित करणाऱ्या) सारख्या झाल्या आहेत.

यात विचारांवर नियंत्रण आहे, कुशलतेने केलेली फसवा फसवी व त्यातून शिक्षित व अशिक्षित यांच्यामधे प्रचंड दरी निर्माण केली आहे. अशिक्षितांना या उपचारपद्धतीची मोठी किंमत मोजावी लागते. अमानवी वागणूक तर यात आहेच, शिवाय आपल्या विविध परंपरा व संस्कृती मधून आलेल्या ज्ञानाच्या व शिकण्याच्या मार्गांपासून लोकांना वंचित ठेवले जाते.

शिक्षण विकासाच्या आंतरराष्ट्रीय आयोगाचा एड्गार फॉअरे (१९७२) अहवालाने (Learning to Be : The World of Education Today & Tommorow) शैक्षणिक

संस्थानी स्वतःला दिलेले आवास्तव महत्त्व, श्रेणी पद्धती व सम वागणूकीच्या मार्गामधले निर्माण केलेले अडथळे यावर टीका केली आहे. फक्त शाळा किंवा संस्थाच शिक्षणाचे कार्य करतात ही आजच्या लोकांची व शिक्षकांची श्रद्धा ही सर्वात मोठी समस्या आहे. अहवालात शालेयकरणाचे सोपे अर्थ व शालेय व्यवस्थेमधे शिकण्याच्या पर्यायी मार्गांचा व समुदायांच्या क्षमतांचा अंतर्भाव करण्याचे आव्हान आहे. या अहवालात शिकण्याचे विविध मार्ग व ठिकाणे यांचा तसेच लोकांना त्यांच्या शिक्षणातून स्वतःचे जीवनमार्ग शोधण्याचे स्वातंत्र्य याचा आदर करण्यात आहे. स्व-शिक्षणाचे महत्त्व ठामपणे मांडणारा व स्व-शिक्षणाच्या पुढाकारामधे होणाऱ्या गुंतवणुकीवर व त्याच्या लोकमान्यतेवर टिपण्णी करणारा आहे.

सध्याच्या बदलत्या परिस्थितीतील मुलांच्या व प्रौढांच्या शिक्षणाच्या गरजा विविध व गुंतागुंतीच्या झाल्या असतानाही, विविध विज्ञानाच्या शाखा शिक्षणामधे मेंदूच्या (बुद्धीच्या) वापराबद्दलचे विविध अभ्यास मांडून शालेय शिक्षणावर आपण कसे अवलंबून राहिले पाहीजे हा फसवा युक्तीवाद मांडत असतात.

सध्याच्या औद्योगिक व यांत्रिक समाजात अजूनही शाळा या शिक्षणाच्या अतिपवित्र जागा आहेत हे मानले जाते. परंतु आता शिक्षणाचे एकमेव केंद्र शाळा आहे, याच्या पगड्यातून बाहेर पडायला हवे व आधुनिक शालेय व्यवस्थांच्यापेक्षा शिक्षणाचे वेगवेगळे मार्ग असू शकतात याचा सृजनशील विचार करायला हवा. जॉन होल्टने म्हटले आहे, शिक्षण हे स्वाभाविक व सहज असायला हवे. आपण ते जितकं नियंत्रणात ठेवू, कसं असावं हे ठरवू; तितके त्याचा स्वीकार होणार नाही. होल्टने असंही म्हटल की मुलांना/लोकांना शिकण्यासाठी, त्यांना फुलविणारे, मदत करणारे, त्यांना जोपासणारे वातावरण निर्माण करायला हवे तरच शिक्षण हे जीवनाचा भाग होऊन जाईल.

...१२

लोकसमूहांशी जोडणारे शिक्षण असायला हवे. शिक्षण हा काही स्वतंत्र, वेगळा भाग नाही, परंतु लोकांशी, जगाशी जोडणारा धागा आहे. आपल्या समुदायासोबतचा सहभाग व योगदान करण्याच्या असंख्य पर्यायांचा शोध घेण्याचा जीवनमार्ग आहे. समुदायाबरोबर घट्ट नाते जोडणारा, त्या मातीत रुजविणारा, स्थानिक क्षमता व उर्जांना सृजनशीलतेने सामावून घेणारा मार्ग आहे.

मानवाच्या सक्षमता वृद्धिंगत करणारी व स्व-शिक्षणाच्या अर्थपूर्ण पर्यायी मार्गांचा शोध घेणारी ही प्रक्रिया परिवर्तनाकडे नक्कीच घेऊन जाईल.

विद्यार्थी (शिकणारा) केंद्रीत शिक्षणाची मूलभूत तत्त्वे :

१. **शिकणाऱ्या व्यक्तिचे स्वतःचे विशिष्ट दृष्टीकोन किंवा संदर्भ चौकटी असतात.** हे दृष्टीकोन त्यांचा इतिहास, पर्यावरण, आसपासचे वातावरण, त्यांच्या जिज्ञासा, त्यांची उद्दिष्टे, त्यांच्या श्रद्धा, विश्वास, विचार करण्याच्या पद्धती, कुटुंब, समूह यामुळे तयार झालेले असतात. त्यांचा विचार व आदर केला तरच लोक स्वतःला शिकण्यामधे गुंतवून घेऊ शकतात व स्वतःच्या शिक्षणाची जबाबदारी स्वतः घेऊ शकतात.

२. **शिकणाऱ्या प्रत्येक व्यक्ति आगळ्यावेगळ्या असतात.** त्यांच्या भावनिक मनःस्थिती, शिकण्याची गती, शिकण्याच्या पद्धती, बहुआयामी बुद्धिमत्ता, विकासाचा स्तर, क्षमता, हुशारी, सामर्थ्याची जाण व गरजा वेगवेगळ्या असतात. या लक्षात घेतल्याच पाहीजेत व त्याप्रमाणे सर्वांना निरंतर शिक्षणाच्या व त्यांच्या स्व-विकासाच्या गरजा पुरवणाऱ्या संधी व आव्हाने निर्माण केली पाहीजेत.

३. **शिकणं ही विधायक प्रक्रिया आहे.** शिकणाऱ्या व्यक्तिच्या व समुदायाला अर्थ वाटणाऱ्या, संदर्भ असलेल्या शिक्षणामधेच हे शक्य आहे. यात शिकणारी प्रत्येक व्यक्ति सक्रीय गुंतलेली असते. तिचे ज्ञान, कौशल्य, अनुभव यांचा सृजनशील वापर यात होत असतो.

४. **सकारात्मक आंतरव्यक्ती नातेसंबंध व संवाद जोपासणाऱ्या वातावरणात शिक्षण सर्वात चांगले होते.** यात शिकणारी व्यक्ति ही मुक्तता, विश्वास अनुभवते. यात शिकणाऱ्या व्यक्तिंची योग्यता, महत्त्व यांचा आदर, महत्त्व, मान्यता, कौतुक व स्वीकार समुदायाने केलेला असतो.

५. **शिकणं ही मूलतः नैसर्गिक प्रक्रिया आहे.** यात शिकणाऱ्या व्यक्ति मुळातच उत्सुकता व त्यांच्या भावविश्वाची समज वाढविण्याची जिज्ञासा घेऊन आलेले असतात. यात प्रत्येक व्यक्तिला निसर्गतः काहीना काही देणं मिळालेलेच असते हा विश्वास असतो.

कार्ल रॉजर्स या मानवतावादी मनोवैज्ञानिकानी स्व-संचलित (self-directed) शिक्षण प्रक्रियेचे मर्म मांडले आहे. यात गुणात्मक वैयक्तिक गुंतवणूक असते. शिकणारी व्यक्ति आपल्या भावनिक व बौद्धिक पैलूंची गुंफण यात करते. स्वतः यात पुढाकार घेते. प्रेरणा जरी बाहेरून घेतलेली असली तरी, शोधाची जाणीव, समजून घेणं, समज वाढविणं, आत्मसात करणं या प्रक्रिया मात्र आतून उर्मी पावतात. ते व्यापक आहे. त्याने शिकणाऱ्याचे वर्तन, वृत्ती व व्यक्तिमत्त्वामधे बदल होतात. त्याचे मूल्यांकन ही शिकणारी व्यक्तिच करते. आपल्या गरजा त्यात पूर्ण होत आहेत का, आपल्याला जे हवे आहे, मिळवायचे आहे ते साध्य होत आहे का, आपल्या अनुभवांमधे दुर्लक्षित होणाऱ्या गोष्टींवर प्रकाश टाकते आहे का याचे मूल्यांकन यात शिकणारी व्यक्ति करते. मूल्यांकनाचे केंद्र शिकणाऱ्या व्यक्तिच्या भोवती असते.

...१४

'जीवनाचे अर्थ' हे त्याचे सार आहे. असं शिक्षण जर होत असेल तिथे शिकणाऱ्या प्रक्रियेला अर्थ देणारे घटक सापडतात. अशा स्व-पुढाकाराने सुरु केलेल्या प्रक्रियेत शिक्षणासाठी पूरक वातावरण रुजते. यात समुदायातील बुजुर्ग, त्यांची हुशारी, अनुभव हे गुरु होतात व शिकणाऱ्यासाठी त्याचे मूल्य महत्त्वाचे व व्यापक असते.

संवाद, कृती, चिंतन याच्या मिलापातून ज्ञान निर्माण होते. ही प्रक्रिया पूर्णपणे राजकीय असते. कारण यात व्यक्ति ही त्याच्या शिकण्याच्या, नातेसंबंधाच्या, व्यक्ति-समुदायाच्या विकासाच्या, पर्यायांच्या निर्णय प्रक्रीयेत स्वतः गुंतलेली असते.

स्व-संचलित (self-directed) शिक्षणाच्या प्रक्रियेचा हेतू हा समुदायाशी, त्यांच्या सक्षमतेशी, त्यांच्या प्रश्नांवरच्या चिंतनाशी भविष्याशी निगडीत आहे. यातून त्यांचे सामुहिक भविष्य, जीवनाचे अर्थ, हेतूपूर्तता होणार आहे.

***

# शिक्षणाच्या नव्या दिशा :
# शिकणाऱ्या लोकसमूहांची शिक्षण प्रक्रिया

'समकालीन शिक्षण : वास्तव व अपेक्षा'
११वे विचारवेध संमेलन २००३ येथे मांडलेले विचार

सुजाता बाबर

समाज परिवर्तनाच्या, बदलाच्या, लोकविकासाच्या प्रक्रिया जवळून पाहताना, विकासाचे अनेक अर्थ, अनेक प्रक्रिया, लोकसहभागाचे अनेक पैलू दिसून आले. या अनुभवातून एक विचार करायला भाग पाडलं ते म्हणजे परिवर्तन किंवा विकास याचा अर्थ सर्वार्थाने समजून घ्यायचा असेल तर 'शिक्षण' हे व्यापकतेने समजणे गरजेचे आहे. त्याबद्दल विविध स्तरांवर, अनेक अर्थांनी, वैज्ञानिक दृष्टीने पाहणे व विचार करणे गरजेचे आहे.

पर्यायी विकासाच्या कामात ही लोकांबरोबर काम करित असताना लोकांची 'घेण्याची', 'ग्राहकाची' भूमिका व वृत्ती तयार होताना दिसते आहे. तसेच सामाजिक संस्था या 'देणाऱ्या', 'तज्ञ' या अभिनिवेशात वावरताना दिसतात. अर्थातच याला अपवाद आहेतच. परंतु हे जास्त प्रमाणात आढळणारे वास्तव आहे. या देणाऱ्या घेणाऱ्या संस्कृतीला, आपल्या आसपासच्या शासन व्यवस्था, प्रणाली व कार्यपद्धतींना खतपाणी घालणारे विचार व वृत्ती या 'शालेयकरणाच्या संस्कृती' ने घातलेले आहे हे आता फारसे लपून राहिलेले नाही.

लोक जागरुकता निर्माण करायची असेल तर 'शिक्षण' हे मौल्यवान हत्यार आहे हे अनेक जणांनी जोखले होते. त्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्नही झाले. विविध चळवळी जन्माला आल्या. विशेषतः महाराष्ट्रात यांचा मूलभूत व सखोल विचार झालाच

शिवाय प्रत्यक्ष कृतीही झाल्या. परंतु काळाच्या ओघात सर्वार्थाने व्यापक असलेल्या शिक्षणाचा अर्थ संकुचित स्वरुपात पुढे येत गेला. शिक्षण व शाळा यांचा संबंध ठामपणे लोकांवर बिंबवला गेला व शाळा हे एकमेव शिक्षणाचे केंद्र आहे ही व्याख्या प्रस्थापित केली. शिस्त, स्पर्धा, आत्मकेंद्री वृत्ती, परावलंबीत्त्व यांना खतपाणी देणारी शिक्षण पद्धती निर्माण झाली. शिक्षण, साक्षरता याचा सरळसरळ अक्षरज्ञान व संख्याज्ञान किंवा साध्या भाषेत गणित व लिहिणं-वाचणं हा अत्यंत उथळ व मर्यादित अर्थ पसरविला गेला.

शालेयकरणाच्या संस्कृतीने सुशिक्षित, अशिक्षित, ज्ञानी, अडाणी, अनपढ, गावंढळ अशा अनेक संकल्पना जन्माला घातल्या. शाळेत शिकलेला म्हणजे बुद्धीवादी, सन्मानीय व प्रतिष्ठीत असे वलय उभे केले. आपण शाळेत न गेलेल्यांच्या ज्ञानाचा आदर, स्वीकार, सन्मान करू शकतो?

शिक्षणाने प्रगती होते हा एक दावा शालेयकरणाच्या संस्कृतीने केला आहे. परंतु आपल्या क्षमता, विचारप्रक्रिया, संवाद, नातेसंबंध, आपला इतिहास, आपल्या सांस्कृतिक परंपरा यामुळे आपल्या अंतर्गत निर्मिलेल्या ठेव्यावरचा विश्वास उडविणारी ही प्रक्रिया ठरली आहे. मुले व प्रौढ दोघांमधल्या सृजनशीलतेला मारक ही प्रक्रिया आहे. शालेयकरणामुळे ज्ञानाचे सपाटीकरण तर झाले आहेच पण त्याचबरोबर अत्यंत ठराविक उत्तरे, स्पर्धा, ताणतणाव, भिती, साशंकता, अपयाशाचे भय ही निर्माण झाले आहे. स्वयंशोधाची व या शोधातून शिक्षणाची प्रक्रिया नष्ट करण्यात आली आहे.

पांढरपेशा नोकरीला महत्त्व प्राप्त झाले आहे. बुद्धीवादी व कारकुनी नोकरीला नको ते स्थान, श्रेष्ठत्त्व निर्माण झाले आहे. श्रम व त्यातून मिळणारा आनंद, श्रमजीवी, कष्टकरी यांच्या जगण्याचे अवमूल्यन या शिक्षणाने केले आहे.

## क्षणोक्षणी शिक्षण

शिक्षण ही अत्यंत स्वाभाविक व निरंतर प्रक्रिया आहे. त्याची आस्था व प्रवृत्ती या आपल्या आयुष्यातील प्रत्येक स्वाभाविक कृती व अनुभवांशी जोडल्या आहेत शिकण्यामधील स्वतंत्र, मुक्त अनुभव आधारित स्वयंस्फूर्ती, स्वयंप्रेरणा व सहशिक्षणाचा नवा अर्थ शोधण्याची गरज प्रकर्षाने पुढे येत आहे. शिक्षणाचा आपल्या जीवनाशी, आपल्या मातीशी, आपल्या दृष्टीकोनाशी, आपल्या कुटुंबाशी, आपल्या कार्याशी, आपल्या मैत्रांशी काय संबंध आहे हे शोधायची गरज आहे. आपल जग आपणच समजायचं आहे, आपल्या जगण्यातला अर्थ आपणच शोधायचा आहे, आपल्या विकासाचे, परिवर्तनाचे मार्ग आपणच शोधायचे आहेत आणि हे सर्व शिक्षणातून साधायच आहे. शिकत राहणारे, शिकणारे असे लोकसमूह आपल्यामधे व आपल्या आजूबाजूला आहेतच. त्यांचा शोध घेणं, त्यांची ताकद वाढवणं, त्यांच्या या शिकण्याच्या प्रक्रिया समजून घेणं यासाठी जगभर चळवळ चालू आहे. यात अनेक शिक्षणतज्ञ, विकासकर्मी, संस्था, व्यक्ति सहभागी आहेत. अशाच प्रकारचा शोध अभिव्यक्ति 'क्षणोक्षणी शिक्षण' या प्रक्रिये अंतर्गत घेत आहे.

'क्षणोक्षणी शिक्षण' हा लोकसमूहांची शिकण्याची परिभाषा व प्रक्रिया समजून घेण्याचा प्रयत्न आहे. यातून अनेक शक्याशक्यतांची दालने खुली झाली आहेत. एकमेकांना समजून घेणे, वैयक्तिक व सामूहिक शिक्षणाच्या प्रक्रिया समृद्ध करणे, स्वावलंबन व स्व-राज निर्माण करणे अशा अनेक विकासात्मक प्रक्रिया घडताना अनुभवायला येत आहेत. स्व-अनुभव समजणे, तो सर्वांसमोर मांडणे, इतरांचे अनुभवांचे श्रवण करणे, एकत्रित अनुभवांचे आदानप्रदान, श्रवण, मनन, चिंतन व खंडन या प्रवासातून पुढे जाणारे शिक्षण हे सर्वार्थाने आयुष्याला परिपूर्ण बनवु शकते हा विश्वास या प्रक्रियामधून नक्कीच निर्माण झाला आहे. सहनिर्मितीच्या सृजनशील प्रक्रिया, मातीशी नातं वृद्धींगत करणाऱ्या प्रक्रिया या लोकसमूहांमधून पुढे येत आहेत.

...१८

या नव्या दिशा शोधण्याच्या प्रयत्न अभिव्यक्ति नाशिकच्या जवळच्या आठ गावातल्या विविध लोकसमूहांबरोबर करते आहे. लोकपंचायत(संगमनेर), लोकभारती (गिरणारे), युवा मित्र (सिन्नर) व समिधा (त्र्यंबकेश्वर) या संस्थासोबत हे काम चालू आहे. यात पिंपळगाव कोंझिरा, सायखिंडी, रामनगर, जामगाव, धोंडेगाव, नागलवाडी, सापगाव, शिरसगाव मधील लोक या शोध प्रक्रियेत सहभागी आहेत. शाळेच्या बाहेर शिक्षणाच्या जागा शोधणे, त्यांना स्वमान्यता देणे, लोक शिक्षणासाठी त्या जागा अधिक समृद्ध करणे व शिक्षणाचे नवे अर्थ जगासमोर मांडणे हा महत्त्वाचा भाग या शोध प्रक्रियेचा आहे. मुलं, युवा, कृषक व महिला यांच्यासोबत सहप्रवास चालू आहे. बोलणं, ऐकणं, पाहणं, निरीक्षण करणं, प्रत्यक्ष कृती करणं, त्याचा सराव करणं, चुका करत शिकणं अशा अगदी साध्या शिक्षण प्रक्रियांतून हा प्रयत्न चालतो. यामुळे चिंतन, चिकित्सक वृत्ती, सृजनशीलता, सर्व पिढ्यांअंतर्गत शिक्षण अशा शिकण्याच्या प्रक्रिया घडत आहेत. पारंपारिक ज्ञान, माहितीचा प्रचंड साठा या लोकसमूहांमधे आहे. त्याने बुद्धीवाद्यांना लाजवेल असं शहाणपण (wisdom) या समूहांमधे आहे. या सर्व चर्चा-मंथनातून नवीन प्रक्रियाही जन्माला येत आहेत.

क्षणोक्षणी शिक्षणाला ठराविक अभ्यासक्रम किंवा पाठ्यक्रम नाही. गावात व लोकांमधे अस्तित्वात असलेल्या, गावात रुजलेल्या व येऊ पाहत असलेल्या मूल्य व ज्ञानावर आधारित हा शोध आहे. हे ज्ञान लोक कला, संस्कृती, परंपरा, माहिती व जगण्याच्या विविध पद्धतींबद्दल आहे. बाहेरून आलेल्या शाळा, प्रसार माध्यमे, बाजारपेठा व शासन-नियंत्रण, व्यवस्था यांनी प्रश्न निर्माण केले आहेत. त्यावर गावात प्रश्न उभे करणं, स्वतःची नियंत्रण व्यवस्था निर्माण करणं व समजं वाढवणं हे या प्रक्रियेमधील अंतर्भूत अंग आहे.

**मुलांच्या सृजनशीलता फुलविणारे खेळघर व कल्पक चिकित्सक गट:**

१० वर्षांपर्यंत मुलं एकत्र येऊन खेळ व विविध प्रयोगांमधून शिकण्याची ही जागा. 'खेळ' हे मुलांसाठी वेगळ जग नक्कीच नाही. परंतु शालेयकरणाच्या प्रक्रियेत खेळांतही स्पर्धा व आत्मकेंद्री वृत्ती आली आहे. शहरी खेळाचे वर्चस्वही आले. परंतु खेळघर ही मुलांसाठी स्पर्धाविरहीत व सहकार्याने, सामूहिक शिक्षणाची जागा आहे. मुलांमधे उपजतच असलेल्या बहुआयामी बुद्धीमत्तेला फुलविणारे हे खेळघर आहे. गावातले खेळ, कला, तंत्रज्ञान याला प्रोत्साहन देणारी ही प्रक्रिया आहे. शेती, अवजारे, औषधी ज्ञान याचा मुलांमधे स्वीकार करणाऱ्या प्रक्रिया यात घडत असतात. आपल्या गावातील वनस्पती, नद्या, पिकं, पक्षी, प्राणी, झाडं याचा अनेक अभ्यास मुलं यात करतात. त्याचा जीवनाशी काय संबंध आहे याचा शोध घेतात. यासाठी मुलांना मदत करणारे गावातले संवादक आहेत. मुळातच मुलांमधे असलेली जिज्ञासा, कुतुहल, उत्सुकता, उत्साह यांची सृजनशील जपणूक व फुलविणं या प्रक्रियांचा गाभा आहे.

खेळ, गाणी, संगीत, गोष्ट यातून हा शोध चालू आहे. मुलं आपल्या सृजनशील कृतींद्वारे स्वतःला अभिव्यक्त करतातच शिवाय यातून स्वतः निर्णय घेण्याच्या क्षमता, त्यांची सामूहिक जबाबदारी घेताना मुलं दिसतात. हे खेळघर मुलं स्वतः चालवित, त्याचे नियंत्रण व निर्णयही सामूहिकपणे घेतात. त्यात त्यांना प्रौढांची मदत फारशी लागत नाही. नागलवाडी गावातील रस्ता स्वतःहून दुरूस्त केल्याची, गावात दारुबंदी व्हावी म्हणून ग्रामपंचायतीकडे हट्ट धरण्याची उदाहरणे यात देता येतील. मुलांनी त्यांच्या खेळघराची स्वतःची गाणी देखील रचली आहेत, स्वतःचे खेळ निर्माण केले आहेत.

**सहशिक्षणातून विकासाकडे वेगळ्या नजरेने पाहणारा युवा गट:**

आधुनिकीकरण, गावाच्या आसपास वाढत जाणारे औद्योगिक क्षेत्र, प्रसार माध्यमांचा गावातला सहज शिरकाव यामुळे युवा स्वत:च्या अस्तित्त्वाबद्दल साशंक व अस्थिर होत असताना आपण पाहतोच आहोत. परंतु क्षणोक्षणी शिक्षणाच्या प्रक्रियेअंतर्गत सहशिक्षणाची मुक्त जागा युवांनी शोधली आहे. 'ग्रामीण युवा' म्हणून आपली स्वप्न काय आहेत, गावाचा विकास व आपला काय संबंध आहे, शेती व गाव व्यवसाय यांचे व आपले काय नातं आहे हे शोध या सहशिक्षणाच्या प्रवासात घेतला जातो आहे. बैठका, कार्यशाळा, उत्सव अशा अनेक माध्यमांमधून युवांची अस्वस्थता, तळमळ, द्विधा अवस्था समोर आली आहे. सहशिक्षणांनी या अवस्थेला सामोरे जाण्याच सामर्थ्य दिले आहे. सायखिंडी गावात तर युवांच्या प्रक्रियेमधून कोणत्याही शासन व्यवस्थेची वाट न पाहता गाव विकासाचे मार्ग युवांनी शोधले आहेत. गावात उपलब्ध असलेले वृद्धांकडचे ज्ञान अधिक सक्षमतेने वापरणे व नव्या युगाच्या माहितीच्या साट्याबरोबर, पडताळून विचार करून आपले मार्ग ठरविणे हे या सहशिक्षणामधून साधण्याचा प्रयत्न आहे. या सर्व प्रक्रियांमधे तयार होत असलेली समज 'तरुण संवाद' या मुखपत्राद्वारे युवा मांडत असतात.

**स्वत:चे जगण्याची महिलांची आमची जागा:**

महिलांबरोबर त्यांच्या जगण्यातले सुखदु:ख मोकळेपणाने सांगण्याची ही जागा. परंपरेतून, सांस्कृतिक ठेव्यातून उपजत असलेले औषधी वनस्पतींचे ज्ञान, गावच्या परंपराना जपणाऱ्या लोकगीतांचा वारसापुढे नेणाऱ्या महिलांना, गप्पांमधून एकमेकींना समृद्ध करणारी ही जागा. गावातील समस्यांवर धीराने व एकजुटीने सामोरी जाण्याची, गावाच्या निर्णयात प्रत्यक्ष सहभाग घेण्याची ताकद असणाऱ्या या महिलांचे हे हक्काचे स्थान आहे. शेतीमधे विविध प्रयोग करण्यात त्यांचा पुढाकारही लक्षात घेणारा आहे. स्वत:च्या शारिरीक व मानसिक आरोग्याबद्दल चर्चा घडवून आणणारी ही जागा आहे.

**शेतीमधे प्रयोग करित परवडणाऱ्या शेतीचा शोध घेणारे 'कृषक मित्र':**

रासायनिक खतांचा मारा, बाजारपेठेत दलालांचे वर्चस्व व निसर्गावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या शेतीकडे नव्या दृष्टीने पाहणं, प्रयोग करणं, त्यातून एकमेकांना समृद्ध करणं म्हणजेच कृषक मित्र. सेंद्रीय शेती, नैसर्गिक शेती, वनशेती, परवडणारी शेती असे अनेक प्रयोग शेतकरी करित आहेत. यात येणाऱ्या अनुभवांची परस्पर देवाण घेवाण कृषक मित्र एकत्र येऊन करित असतात. बैठका, कार्यशाळा, गप्पा, प्रत्यक्ष भेटी यासारख्या माध्यमांमधून ही देवाण घेवाण करतात. त्यांच्या नोंदीही ते ठेवतात. यात विशेष म्हणजे महिला कृषकांचा मोठा सहभाग यात आहे.

**गावातील ज्ञानाचा ठेवा जपणारी 'आमची शिकण्याची जागा':**

गावात चालू असलेल्या क्षणोक्षणी शिक्षणाच्या प्रक्रियांना प्रेरित करणारं, प्रोत्साहन देणारं साहित्य गावाची ठेव म्हणून जपणारी 'आमची जागा' (Learning Resource Centre) या गावांमधे आहे. बाहेरील जगाचे अनुभव, ज्ञान तर यात आहेच शिवाय या प्रक्रियेत निर्माण झालेल्या पुस्तिका, भित्तीपत्रके, छोट्या छोट्या वस्तू यांचाही यात समावेश आहेय गावातील युवांनी विशेषतः याची जबाबदारी घेतली आहे. गावातील लोक इथं एकत्र येतात, अनुभव कथन करतात, कधी फक्त येऊन बसतात, वाचतात. युवा या जागेची काळजी घेतात. त्याचे सर्व व्यवस्थापन पाहतात. विविध कार्यक्रम आयोजित करतात. या अनेक प्रक्रियांची गावात आता ओळख निर्माण झाली आहे. गावात रुजलेले पण अदृश्य असलेलं ज्ञान नजरेस येत आहे, मान्यताप्राप्त होत चालले आहे. अर्थातच ही प्रक्रिया अगदी साधी, सरळ, सोपी अजिबातच नव्हती. तिचा स्वीकार सहज नव्हता. अजूनही ती म्हणावी इतकी जोमाने पुढे जाते आहे असे नाही. अनेक अडथळे पार करून किमान स्वतःची गती मात्र निर्माण झाली आहे.

या प्रक्रियेत अनेक आव्हाने समोर आली आहेत -

- या प्रक्रियेला लोकमान्यता कशी द्यायची?
- शिक्षण, शाळा यांच्या अर्थार्जनाशी लावलेला व अनुभवांमधला सरळ सरळ अर्थ बदलण्याचे काय पर्याय आपल्यासमोर आहेत?
- लोकसमूह, शिक्षण व उपजीविका याची नाळ अधिक बळकट कशी करायची?

गावांबाहेर त्याचे महत्त्व पटायला लागले आहे. शाळेच्या बाहेर शिकण्याचे स्थान होतेच व आहेच. परंतु वेगळ्या नजरेतून त्याकडे पाहायला सुरूवात झाली आहे. या सर्व प्रयोगांमधे आमची देखील शिक्षणाची समज वाढत चालली आहे. यातून नवीन दिशांचा शोध आम्ही घेत आहोत. 'शिकणारे लोकसमूह' समृद्ध करणाऱ्या चळवळीत हे साध्य होणार आहे. असा विश्वास आम्हाला आहेच.

'शिकणाऱ्या लोकसमूहां'च्या शिक्षण प्रक्रिया समजून घेण्याच्या चळवळींमधून समाजाचे शिक्षण हे सरकारी नियंत्रणातून मुक्त व्हावे, लोकांनी स्वतःच्या शिक्षणाची जबाबदारी स्वतः घ्यावी. शासन व शिक्षण संस्था यांच्या मक्तेदारीतून शिक्षण हे लोकांच्या हातात असावे, लोकांनी त्याचे उत्तरदायित्त्व स्वीकारावे हे या चळवळीने साध्य व्हावे हे आमचे स्वप्न आहे.

***

## शिक्षणाच्या नव्या दिशा : माध्यम साक्षरता

सुजाता बाबर

शोषक व शोषित हे समीकरण खरं तर कुटुंबापासून आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणात सगळीकडेच पाहायला मिळते. या समीकरणामुळे तयार झालेली विषमता ही अनेक कारणांनी वाढत जातांना आपल्याला दिसते. यात भर टाकणाऱ्या अनेक संस्था ( कुटुंब, धर्म, जातीव्यवस्था....) याचा फायदा घेतांना आपण अनुभवतो. आजच्या युगाचा विचार केला तर माध्यमे यात प्रमुख भूमिका बजावतांना आपल्याला दिसतात. म्हणूनच माध्यमांमधून येणाऱ्या संदेशाकडे चिकित्सक व वैज्ञानिक दृष्टिने पाहण्याची गरज आहे.

अभिव्यक्ति तर्फे प्रसार माध्यमांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक व चिकित्सक व्हावा यासाठी विशेषतः मुलांबरोबर 'माध्यम साक्षरता' हे काम सुरू आहे. मुलांबरोबरच युवा, पालक, शिक्षक यांच्याबरोबरदेखील हे काम सुरू आहे. विज्ञानयुगात झालेल्या विकासाच्या विविध प्रयोगांमध्ये जे काही शोध लागले त्यात वेगवेगळ्या माध्यम तंत्राचे शोध हे सर्वात जास्त सर्वसामान्यांपर्यंत पोहचलेले तंत्रज्ञान. या तंत्रज्ञानातून निर्माण झालेली प्रसार माध्यमे अफाट वेगाने घराघरात पोहोचली. जागतिकीकरणाच्या चक्रात या माध्यामांमधून अनेक प्रकारची मूल्ये, राहणीमान, विचार यांची होणारी आदानप्रदान आपल्याला पावलोपावली अनुभवायला मिळते व त्याचा परिणाम हा सगळीकडेच दिसून येतो. मुलं हा समाजातील संवेदनशील व लवचिक घटक, या गटच्या एकूणच जीवनपद्धतीत हा प्रभाव आपल्याला प्रकर्षाने जाणवतो याचा विचार करून माध्यम साक्षरता हा उपक्रम अभिव्यक्ति, नाशिक मधील विविध शाळांमधून घेत आहे. यात प्रामुख्याने आपल्या अवती भवती वावरणारी माध्यमे, टी.व्ही, सिनेमा, जाहिराती, गाणी, वर्तमानपत्रे, पुस्तके, इंटरनेट व त्यातून येणारे संदेश यांवर चिकित्सक विचार करायला लावणारा अभ्यासक्रम तयार केला आहे.

या सर्व प्रसार माध्यमांमधून होणारा संवाद, त्याचे रूप, स्वरूप, त्याची भाषा, त्याची तंत्र, त्यांच्या युक्त्या याचे विश्लेषण करून प्रसार माध्यमे आपल्यापर्यंत नेमके काय पोहचवित आहेत? याचा विचार करायला लावणे हे या माध्यमशिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट.

प्रसार माध्यमांचा प्रभाव हा प्रचंड जाणवतो कारण त्यांची ताकद. अफाट वेग व प्रचंड पोहोच ही त्यांची मुख्य ताकद. जगाच्या कानाकोपऱ्यात घडलेली गोष्ट ताबडतोब, दुसऱ्या क्षणाला आपल्या सर्वांपर्यंत पोहचते. अगदी वन डे मॅच असो अथवा वर्ल्ड ट्रेड सेंटर वरचा हल्ला! हे सगळं आपल्यापर्यंत पोहोचत असतांना कुणाच्या नजरेतून, विचारातून पोहोचत आहे, यात कुणाचा फायदा आहे, यात कुणाचा बळी जातो आहे याचा विचार करण्यासारखं आहे. आपल्याला गुलामगिरीतून सोडविण्यासाठी लोकांनी विचार करावा या क्रांतिकारी विचारांनी सुरू झालेल्या वर्तमानपत्रात आज आपल्याला काय दिसते? तर स्पर्धा व व्यापार यांच्या कात्रीत आज आपल्याला सगळी वर्तमानपत्र दिसतात. सामाजिक क्रांतिपेक्षा आर्थिक फायद्याला महत्त्व देणारी आजची वर्तमानपत्रे नीट पाहिली तर हे नेमकं वर्तमानपत्र आहे की, जाहिरात पत्र हा प्रश्नच पडतो. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे वर्तमानपत्र असो की स्थानिक, त्यात कोणाचे विचार आहेत. कोणाचा फायदा त्यात आहे, हे विचार पसरविण्यामागे कोणाचे व काय छुपे हेतू आहेत. याची विश्लेषणात्मक दृष्टी वाढायलाच हवी. नाहीतर अगदी सकाळी सकाळी वेळेवर वर्तमानपत्र न आल्यास बेचैन होणारे आपण कधी या विचारांच्या स्वाधीन होतो ते समजणार कसं!

टी.व्ही. या माध्यमाने तर अनेक प्रकारचे प्रभाव समाजावर पाडले आहेत. चोवीस तास असलेल्या १००च्या पेक्षा जास्त वाहिन्या. प्रचंड माहिती व सचित्र यामुळे सर्वाधिक लोकप्रिय असलेले हे माध्यम. माध्यम साक्षरतेत मुलांबरोबर टी.व्ही. बद्दल बोलत असताना मुलांना एकदम धक्का बसतो तो म्हणजे टी.व्ही. सोबत आपण किती वेळ घालवतो याचा. आपली दिनचर्या, शाळा, अभ्यास याचा वेळ सोडला तर आपल्या स्वतःच्या हक्काच्या उरल्या सुरल्या चार तासातले दोन अडीच तास आपण टी.व्ही.च्या

सान्निध्यात घालवतो. त्यात ही आपल्याला कोणते कार्यक्रम दाखविले जातात;त्यातून कुठलं राहणीमान आपल्याला दाखविलं जातं, कोणती मूल्ये वारंवार ठासविण्याचा प्रयत्न असतो. कुणाचे आचार विचार आपल्यापर्यंत पोहोचविले जातात. याचा विचार करून फक्त चालणार नाही पण आपलं नियंत्रण कुठपर्यंत व कसे ठेवू शकतो. याबद्दल बोलणं जास्त गरजेच वाटतं. एकूण आपण सगळेच अनुकरणप्रिय असतो. पण ते अनुकरण करतांना ते फक्त भौतिक गोष्टीपर्यंत मर्यादित न राहता वैचारिक बैठका करण्यात कधी रुपांतरित होत हे समजत नाही. टी.व्ही. मधील अनेक मालिका, सिनेमांवर आधारित कार्यक्रम यातून दाखविली जाणारी हिंसा बघतांना आपल्या संवेदना बोथट होतात आणि वास्तवातील हिंसा व निर्माण केलेली खोटी हिंसा यातला फरकही समजेनासा होतो. टी.व्ही.वरच्या सर्व मालिकांचा विचार केला तर कुणाची जीवनपद्धती दाखविण्याचा प्रयत्न होतो आहे? त्या आपल्या सर्वसामान्य माणसाच्या आहेत का?, त्यांचे प्रश्न हे आपल्या प्रश्नांशी निगडीत आहेत का? या विशिष्ट जीवनपद्धतीचा, त्यातील मुल्यांचा मारा करून ते का आपल्यावर थोपविण्याचा प्रयत्न होतो आहे? आणि त्यातलं मुलांना पाहण्यासारखं काय असतं? १९९६ साली झालेल्या अभ्यासात असं लक्षात आलं होतं की ५४ वाहिन्यांवरून दाखविल्या जाणाऱ्या सर्व कार्यक्रमांमधे फक्त १७ कार्यक्रम मुलांनी पाहायला हरकत नाही असे असतात.

जाहिराती खरं तर मुलांना सर्वात जास्त आकर्षित करून घेणारं माध्यम. अत्यंत थोड्या वेळात व नेमका संदेश देणारं हे माध्यम सर्वांनाच आकर्षित करून घेतं. मालिकांपेक्षाही सर्वात जास्त मूल्य रूजविणारं हे माध्यम म्हटलं तरी चालेल. स्त्रियांनी अमुक एका तऱ्हेने राहावं,वागावं, पुरुषांनी एका तऱ्हेने राहावं, वागावं, मुलं कशी असली पाहिजेत? युवांची स्वप्न काय आहेत? सौंदर्य म्हणजे काय?, यश कशात आहे?, नाते सबंध कसे असावेत?, काय केलं तर दुसऱ्यावर प्रभाव पडतो? कसं बोलावं, चालावं? हे सगळं काही सेकंदाच्या कालावधीत प्रभाव पाडणारं हे माध्यम ''वस्तू''च्या नावाखाली विशिष्ट जीवनशैली व मूल्य विकणार हे माध्यमं. घ्यायची आहेत का आपल्याला विकत?

संगीत हे देखील एका माणसाच्या विविध भावना व्यक्त करणारे एक सृजनात्मक माध्यम. पण आज त्या माध्यमाचा व्यापारासाठी केला जाणारा उपयोग/वापर अत्यंत घृणास्पद आहे. सिनेमा सारख्या माध्यमातून कोणती संस्कृती पसरविण्याचा प्रयत्न केला जातो. जात, धर्म, पुरुषप्रधानता, हिंसा यांचा शस्त्रासारखा वापर या सिनेमामधून केला जातो व त्यातून समाजाची मानसिकता तयार होण्यास यांची खूपच मदत होते. आयुष्यापेक्षा बोजड भव्यपणा रुजविण्याचा प्रयत्नही यातून दिसतो.

नव्यानेच रुजू झालेल्या इंटरनेटसारख्या माध्यमातून माहितीचा स्त्रोत सगळीकडे वाहतो आहे. या माहितीचं करायचं काय? त्याचा काय वापर करायचा? हो कुठली माहिती आहे, ती आपल्याला मिळून काय मिळणार आहे? याचा विचार आपण करतो का? या माध्यमाला 'महाजाल' ही म्हटलं जातं. सगळ्यांना या जाळ्यात अडकविण्याची क्षमता यात आहे. या अडकण्यानंतर करायचं काय? हे सगळे प्रश्न नवे चेहेरे घेऊन आपल्यासमोर आहेतच. मुलांबरोबर या विषयांवर बोलतांना जाणवतं ते म्हणजे बरोचदा हे सगळ घडवून आणलेल आहे, तयार केलंलं आहे, हे म्हणजे वास्तव नाही हे एकीकडे मुलांना समजत असतं पण माध्यमांमधून येणाऱ्या वेगळ्या, नव्या जगाकडे, स्वप्नांकडे पण खेचले गेल्याची जाणीव मुलांना होत असते. यात चुक काय, बरोबर काय, योग्य आणि अयोग्य काय, आपल्यासाठी समर्पक काय हे शोधण्याची, विचार करण्याची जाण मुलांमध्ये निर्माण करणं ही आवश्यक आहे.

माध्यमांचे फक्त एवढेच परिणाम आपल्याला दिसतात का? खरं म्हणजे माध्यमांनी आपल्याला अनेक दालनं खुली करून दिली आहेत. नवनवीन व्यवसायाची, तंत्रांची, कौशल्यांची, सृजनशीलतेची. अनेक कलांना वाव दिला आहे. अनेक विषयांना जगाच्या समोर आणलं आहे. कानाकोपऱ्यातल्या माणसाला माध्यमांमध्ये वावरायची संधी आहे. गरज आहे आपण या संधीचे फायदे घेण्याची. म्हणूनच माध्यम शिक्षणाचं एकूणच शिक्षणामध्ये महत्त्वाचं स्थान दिसतं. आपल्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर चर्चा, मंथन करण्याची संधी माध्यमांनी उपलब्ध केली आहे. अनेकविषय जे कदाचित इतर

वेळी बोलणं अवघड वाटलं असतं असे विषय माध्यमांनी समोर आणले आहेत. माध्यम साक्षरतेत ही संधी असते. शिवाय याची पद्धती ही वेगळी आहे. सर्वांना आपली मतं व्यक्त करण्याची संधी यात आहे. सर्वांच्या मतांचा आदर करण्यास इथे संधी आहे, सर्वांच्या मतांचा स्वीकार करायची वृत्ती इथे जोपासली आहे. माध्यमांमधून सर्वांना 'एक सारखं' करण्याचा जो प्रयत्न असतो त्याला तडा देण्याची ताकद या माध्यम साक्षरतेत आहे. विविधता मग ती संस्कृतिमधली असो की विचारसरणीमधली, ती असते, असू शकते. ही वृत्ती त्यात जोपासण्याचा पूर्ण प्रयत्न असतो. ही वृत्ती आजच्या शालेय शिक्षणाच्या पद्धतीमध्ये कुठेच जोपासली जात नाही. माध्यम साक्षरतेत ही संधी आहे. स्वतःची मत मांडण्याची, स्वतःच्या सृजनशीलतेला वाव देण्याची पूर्ण मोकळीक यात आहे. हे बरोबर, हे चूक अशी लेबल्स कोणावर थोपविली जात नाहीत. प्रत्येकाला आपले वेगळे विचार असू शकतात व त्यांचा स्वीकार व आदर आपण केला पाहिजे ही समज इथे वाढण्यास खत पाणी मिळते. प्रत्येकाचा आगळेपणा, वेगळेपणा जपण्याचा प्रयत्न या सत्रांमध्ये केला जातो.

जवळजवळ दोन हजार मुलांपर्यंत आम्ही पोहोचलो आहोत. यात शाळेत जाणारी, रस्त्यावरची मुलं यांचा समावेश आहे. त्यांचे अनुभव, त्यांच्यात मुळातच असलेली जिज्ञासा, चिकित्सक वृत्ती, सृजनशीलता याला पूर्ण वाव देणारे हे शिक्षण त्यांना वाटते तसेच जिव्हाळ्याच्या प्रश्नावर यात चर्चा होते याचा आनंदही त्यात असतो. सर्वात महत्त्वाचं त्यांना वाटतं ते या सत्रामध्ये सत्र घेणाऱ्या संवादकाच्या बरोबरीनं निर्माण झालेलं नातं, बरोबरीचं समानतेच नातं. इथे कुणी एकच ज्ञानी व ज्ञान प्राप्त करणारे अनेक जण. या आजच्या शिक्षण पद्धतीनं प्रस्थापित केलेल्या संस्कृतीला तडा दिला आहे. 'सर्वच जण शिकणारे' हे मुख्य तत्त्व या शिक्षणात आहे म्हणूनच सर्वांना हे भावतं.

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतच नाही तर स्वप्नांवरही वर्चस्व गाजविणाऱ्या माध्यमांना तोंड द्यायचं असेल तर आपण आपल्यालाच सक्षम केलं पाहिजे व ही ताकद या माध्यम साक्षरतेत आहे.


***


# अभिव्यक्तिमधून...
# शिक्षणाच्या नव्या दिशा व प्रयोग


## माध्यम साक्षरता

सध्याच्या माध्यम युगात, प्रसार माध्यमांचा सर्वांवरच प्रभाव दिसून येतो. विशेषतः मुले यात सर्वात जास्त अडकलेली आपल्याला दिसतात. प्रसार माध्यमांच्या प्रभावाचा परिणाम कमी होण्यासाठी मुलांमधे चिकित्सक दृष्टी निर्माण व्हावी याकरीता **माध्यम साक्षरता** हा उपक्रम आहे. शाळांमधून हा उपक्रम चालतो. शिवाय युवा व मुलांबरोबर कार्यशाळाही घेतल्या जातात. या कार्यशाळांचा अवधी हा साधारण १५ तासांचा आहे. यात सिनेमा, वर्तमानपत्रे, जाहीराती, टी.व्ही. सिरीअल्स याबद्दल रंजक पद्धतीने चर्चा घेतल्या जातात.











## बाल चित्रपट उद्यान

चिल्ड्रेन फिल्म सोसायटीतर्फे खास मुलांसाठी बनविलेले चित्रपट दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी सर्कल थिएटरला दाखविले जातात.

यात चित्रपट दाखविल्यानंतर मुलांबरोबर संवादही साधला जातो. याचे वार्षिक सभासदत्वही उपलब्ध आहे.



## सुजाण पालक

प्रसार माध्यमांचं वाढतं आक्रमण, विभक्त कुटुंबपद्धती, एक अथवा दोनच मुलं, वेगवान व स्पर्धात्मक वातावरण या सगळ्यामधे पालक-बालक संवाद अधिक दृढ, निकोप व मोकळा व्हावा याकरीता 'पालक' म्हणू स्वतःचा नव्याने विचार करावा लागतो. आपल्या मुलांशी हा मनमोकळा संवाद कसा साधावा, निकोप नातं कसं निर्माण होईल यावर विचार करायला लावणारी ही कार्यशाळा आहे. यात रोज ५ तास, अशा दोन दिवसांच्या कार्यशाळा खास पालकांसाठी आहेत.

## सांगाती

मुलांच्या वाढत्या वयात येणाऱ्या प्रश्नांना, शंकांना आपण पालक म्हणून त्यांच्याबरोबर संवाद साधावा असं वाटत असतं. पण कधीकधी संकोच तर कधी पूर्ण माहीती नसणं या प्रश्नांना व शंकांना तोंड देण्यास आपण कमी पडतो. मुलांशी या विषयावर मोकळा संवाद 'सांगाती' शिबिरांमधून साधला जातो. अगदी सोप्या, सहज पद्धतीने ही शिबिरे घेतली जातात. यांचा कालावधी साधारण १५ तासांचा असतो.




## Liberate School

पारंपारिक शिकण्याच्या पद्धतींमधे 'अनुभवातून शिकणं' आपल्यामधे अजूनही खोलवर रुजलेलं आहे. या शिक्षणाची देवाण घेवाण व त्यातून निर्माण होणारे 'सहशिक्षण' अनेक सृजनशील प्रक्रियांना जन्म देते. क्षणोक्षणी होणाऱ्या शिक्षणाने एकमेकांना समृद्ध करण्याचा प्रवास आम्ही रामनगर, जामगाव, शिरसगाव, सापगाव, धोंडेगाव, नागलवाडी, सायखिंडी व पिंपळगाव कोंझिरा या गावात मुले, युवा, महिला व कृषक यांच्याबरोबर करित आहेत.

अशा प्रकारच्या शिक्षण प्रक्रिया **Aide et Action** तर्फे भारतात विविध ठिकाणी चालू आहेत. **AeA** ही १९८१ साली पॅरिस येथे स्थापन झालेली अशासकीय संस्था आहे. तिसऱ्या जगातील दुर्लक्षित असलेल्या समुदायाच्या सबलीकरणाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून **AeA**ची स्थापना करण्यात आली. मुलांच्या सबलीकरणाचे मुलभूत व महत्त्वाचे साधन म्हणून शिक्षण असेल. ही गोष्ट संस्थेने लक्षात घेतली.

गेल्या २३ वर्षांपासून भारतात काम करत असतांना भारतीय पद्धतीतील समस्यांचे तीन घटकांत वर्गीकरण केले. त्यापैकी एक म्हणजे अकार्यक्षम व्यवस्थापन, कालबाह्य अभ्यासक्रम, शैक्षणिक परिस्थितीबाबत आणि शिक्षण प्रक्रियेबाबत निष्काळजीपणा.

म्हणून Liberate School (शाळामुक्त शिक्षण) या प्रकल्पांतर्गत संस्थेने भोपाळच्या विभागिय केंद्रामार्फत एक वेगळे मुलभूत शिक्षण सुरू केले. भारतातील मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि उत्तरांचल या तीन राज्यांमध्य हा प्रकल्प चालविला जातो.



## 'अभिव्यक्ति'ची क्षणोक्षणी प्रक्रियेअंतर्गत प्रकाशने....

### खेळघर सजलंया :




पारंपारिक शिकण्याच्या पद्धतींमधे 'अनुभवातून शिकणं' आपल्यामधे अजूनही खोलवर रुजलेलं आहे. या शिक्षणाची देवाण घेवाण व त्यातून निर्माण होणारे 'सहशिक्षण' अनेक सृजनशील प्रक्रियांना जन्म देते. 'खेळघर' ही मुलांची हक्काची व आपली वाटणारी जागा. या जागेत सहशिक्षणामधून निर्माण झालेल्या, मुलांनी व खेळघर ताई दादांनी रचलेल्या गाण्यांचे हे संकलन.

### कृषक नोंदी :





क्षणोक्षणी शिक्षणांतर्गत गावांमधे घडत असलेल्या अनेक प्रयोगांमधे काही प्रयोग आपले कृषक करित आहेत. या प्रयोगांना नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, परवडणारी शेती, वनशेती.. अशा विविध नावांनी संबोधले जात आहे. आपल्या गावांमधले हे प्रयोगांचं व अनुभवांचं संचित सर्वांपर्यंत पोहोचलं तर त्याचे ज्ञान सर्वांसाठी खुले होईल. यासाठी या कृषक नोंदी.

### अबुक दुबुक :




'खेळ' हे आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातील अविभाज्य अंग. खेळ म्हटले की धावणे, पळणे, हसणे, उड्या व आनंद. शरीर, भावना व बुद्धी यांना मोकळे करण्याचे मस्त माध्यम म्हणजे खेळ. क्षणोक्षणी शिक्षणमधील खेळघरांमध्ये नेहमी खेळल्या जाणाऱ्या व पारंपारिक खेळांचे संकलन.

**माझे पान :**




क्षणोक्षणी शिक्षणमधील कार्यकर्त्यांची स्वतःच्या शिक्षणाविषयी मते मांडायला, त्या विषयी आपली जागरुकता, समज वाढवायला 'माझे पान' हे माध्यम तयार झाले. स्व-जागरुकता,स्व-समज, स्वानुभव या व्यतिरिक्त 'माझे पान' मधून प्रत्येक व्यक्तीची स्वभाव वैशिष्ट्ये, लेखन शैली व विचार करण्याच्या प्रक्रियेचीही थोडक्यात प्रचिती येते.


**खेळघर दैनंदिनी :**



ही द्वैवार्षिक प्रतिक आहे खेळघरातील मुलांमधील कल्पकता व सृजनशीलतेचे. त्यांनी रचलेली गाणी, गोष्टी, भेटकार्ड, चित्र... यातून घेवून आपणही आपली कल्पनाशक्ती अभिव्यक्ति करावी त्यासाठीच काही कोरी पाने...

**तरुण संवाद :**

क्षणोक्षणी शिक्षण अंतर्गत युवा सहशिक्षणांमधून गावात घडत असलेल्या घटना, युवांचे अनुभव व शिक्षण यांना जागा देणारे व्यासपीठ म्हणजे तरुण संवाद हे द्वैमासिक.



## 'अभिव्यक्ति'ची प्रकाशनै....

**पुस्तिका -**

सा रे ग म सारे सम

माझं मन माझं शरीर

मला आहे माझा चेहरा

आवाज

प्रसार माध्यमांच्या जगात

मुलगी म्हणजे? मुलगा म्हणजे?

किमया रेषांची, दुनिया चित्रांची

लाल पुस्तिका

निळी पुस्तिका

माध्यम लोगों से लोगों तक

माध्यम वेध

In the World of Mass Media

Media Education in Indian Context

नातं : माझं आणि माध्यमांच

सुकन्या

टी.व्ही.पासून मुक्तता!

खेळघर सजलंया!

बहुआयामी बुद्धिमत्ता

**नियतकालिके -**

'अभिव्यक्ती' त्रैमासिक

'सत्यचित्र' व्हिडीओ मॅगझिन

'खुल्लमखुल्ला' (मुलांसाठी)

'मैत्री' मासिक (युवांसाठी)

Expressions Annual

'तरुण संवाद' (युवांसाठी)

'आम्ही पालक' (पालकांसाठी)

**फ्लॅश कार्ड संच -**

बचत गट एकीचा गट

**फ्लॅनेल गोष्ट -**

चाकोरी

**पपेट संच -**

सावित्रीचा मार्ग खरा की खोटा?

**पोस्टकार्डस् -**

माध्यम शिक्षण

**पोस्टर्स -**

सुजाण पालकत्व

मुलगी म्हणजे? मुलगा म्हणजे?

गावरान बियाणे

सुकन्या

माध्यम शिक्षण

**बुकमार्कस् -**

राखी (शुभेच्छा पत्र)

आपल्या काळात

जीवनसाथी,सांगाती

नाती कशी असावी

मर्दानगी

डोल बाई डोलाची (स्टिकर)

**ऑडिओ कॅसेटस् -**

सा रे ग म, सारे सम

चल चल रंगे शाळेला

गाणी जंगलाची

गाणी एकीची : आमच्या शक्तिची

लड़त जा रे

**प्रशिक्षण पुस्तिका -**

सुसंवादाच्या पाऊलखुणा

खेळघर साथी

**व्हिडीओ कॅसेटस् -**

डोमखेडी सत्याग्रह

भू-अधिकार सत्याग्रह पदयात्रा

गुजरात भुकंप - परिधी के प्रतिध्वनी

उद्गम विकासांत - पी.डी. हंकारे

गाण्यात गोष्ट जंगलाची

बाळाची शाळा

लढा

जंगलच्या वाटा

आम्ही पालक

**अभिव्यक्तिविषयी...**

लोक व्यवहारात माध्यमांचा वापर व माध्यम व्यवहारात लोकांचा सहभाग वाढावा यासाठी अभिव्यक्ति ही सामाजिक संस्था कार्यरत आहे.


# अभिव्यक्ति

**मीडिया फॉर डेव्हलपमेंट**

३१-ए, कल्याणी नगर, आनंदवली शिवार,

गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.

फोन व फॅक्स नं. ०२५३-२३४६१२८

e-mail: abhivyakti@sancharnet.in

Website : www.abhivyakti.org.in